# येशूने दिले तसे शिक्षण नवीन पुढायांना दया:

## पित्याने पुत्रांना शिकवून तयार करावे तसे नवशिक्या पुढायांना तयार करा.

मुलांना शिकवणाऱ्यांनी T3b हा अभ्यास वाचावा.

### 1. नवशिक्या-शिकाऊ पुढायांना प्रशिक्षण देव्यास प्रार्थनापूर्वक वचनातून तयारी करा.

**प्रार्थना:** ''प्रिय स्वर्गीय पित्या, तुझ्या पुत्राने येशूने नवीन पुढायांना प्रशिक्षण देऊन, त्या विषयीचा आदर्श आमच्यासमोर ठेवला आहे. त्याचा शिष्य पौल यानेही आम्हांला याबद्दलचे मार्गदर्शन केले आहे. कृपा करुन, नवीन मंडळया व गटांची सेवा करण्यासाठी अनेक नवीन पुढारी शिकवून तयार करण्यास आम्हांला सामर्थ्य व शक्ती पुरव.''



पाहा **मार्क 6:1-6** मध्ये येशूने मोठया लोकसमुदायाला शिक्षण दिल्यावर काय घडले.

- येशूच्या बोलव्याला लोकांनी कसा प्रतिसाद दिला? *(ने थक्क होऊन ऐकन राहिले, वचन 2.)*
- येशूचे बोलणे ऐकून काही जणांनी काय प्रतिसाद दिला? *(उपहास करुन वचन 3, अविश्वास वचन 6)*

पाहा **मार्क 6:7-13** मध्ये येशूने नवीन पुढाऱ्यांना लहान गट करुन कशा प्रकारे शिकवले.

- प्रशिक्षण घेणाऱ्यांचे गट किती मोठे होते? *(दोन-दोन असे एकूण बाराजणांचे गट, वचन 7)*
- येशूने आपल्या प्रशिक्षाणार्थीच्या बाबतीत काय केले? *(त्याने त्यांना कार्य करण्यासाढी अधिकार दिले, वचन 7, आणि कार्य कसे करायचे याबद्दल त्यांना मार्गदर्शन केले, वचन 8)*
- येशूच्या प्रशिक्षाणर्थीनी इतरांना शिकवव्यास कधी सुरुवात केली? *(तत्काळ, वचन 12)*
- ह्यां पहिल्या फेरीमध्ये येशूच्या प्रशिक्षार्थींनी कोणत्या प्रकास्वे कार्य केले? *(सुवातीप्रसार, आरोग्य देणे)*
- येशूने प्रशिक्षणार्थींना आर्थिक मदत दिली? *(नाही, बरोबर काहीही होऊन जाऊ नका असे सांगितले, वचन 8)*
- येशूच्या प्रशिक्षाणार्थी शिकलेल्या गोष्टी कोठे प्रत्यक्ष अमंलात आणल्या? *(गावागांवामध्ये आणि घरोघर)*

पाहा **मार्क 6:30-32** मध्ये येशूने प्रशिक्षार्णी न्याच्याकडे परत आत्मे तेव्हा काय घडले.

- येशूच्या प्रशिक्षणार्थींनी त्याला येऊन काय बातमी दिली? *(त्यांनी जे जे केले व शिकवले ते ते सर्व येऊन सांगितले)*
- येशूने त्यांचे म्हणणे ऐकून होतल्यार ते कोठे गेले? *(ने रानात एकांत ठिकाणी गेले).*

### येशूच्या प्रशिक्षण पद्धतींमधील पाच तत्वे

- मोठया गटांना शिकवणे पुरेसे नाही, प्रत्येक प्रशिक्षाणार्थीची मंडळी काय करीत आहे याचा अहवाल ऐकव्यासाठी पुरेसा मिळावा यासाठी लहान गटांमध्ये प्रशिक्षण देणे अगत्याचे आहे.

- येट कृतीशील कार्यामध्ये आपले शिक्षण लागू करणाऱ्यांना प्रशिक्षण दया.
- तुमच्या प्रशिक्षाणार्थीना त्यांचे काम करण्याचा अधिकार दया आणि त्यांनी कोठे व काय काम करायचे याचे मार्गदर्शन करा.
- त्यांनी थोडेसे काम केल्यावर त्यांनी काय काम केले व ते काय बोलले याविषयीचा अहवाल ऐका.
- सेवकासाठी वेळोवेळी शिबिरे आयोजित का म्हणजे या ठिकाणी त्यांना थोडा आराम मिहेल आणि अधिक शिकवा येईल.

**पाहा 2 तीमथ्य 2:1-2** मध्ये कोणी कोणाला प्रशिक्षण दयायचे.

- पौल व तीमथ्य ह्यांच्यातील नात्याचे वर्णन करा. *(पित्याने पुत्राला शिक्षण दयावे तसे हे नाते होते).*
- पौलाने कोणाकोणाला प्रशिक्षण दिले? *(तीमथ्य व इतर अनेक जण, यात सीला व तीत ह्यांचा समावेश होता).*
- तीमथ्याने कोणाला शिकवायचे होते? *(विश्‍वासू सेवकांना)*
- विश्‍वासू सेवकांनी कोणाला शिक्षण दयायचे होते? *(इतरांनाही)*
- शिक्षण देव्याच्या ''साखळीत'' किती दुवे आहेत? *(चार : पौल, तीमथ्य, विश्‍वासू माणसे, इतर)*

पाहा **कलस्सै. 1:1-9** व **4:15-18** मध्ये पौलाने नवशिक्या पुढाऱ्यांना कसे प्रशिक्षण दिले.

- पौलाने मुख्यत्वे करुन कोणाला प्रशिक्षण दिले? *(तीमथ्य, वचन 1)*
- पौल व तीमथ्याने सहकारी म्हणून कोणाला शिक्षण दिले? *(एपफ्रास, वचन 7)*
- कलस्सै येथील विश्‍वासणाऱ्यांना कोणी शिक्षण दिले? *(एपफ्रास, वचन 7. त्याने करमस्सैकरांची वाढ आणि गरजा याविषयी तीमथ्य व पौल ह्यांना कळवले)*
- पौल व तीमथ्य हंयानी पत्र लिखाणा व्यतिरिक्त कलस्सैकरांची सेवा कशा प्रकारे केली? *(त्यांनी त्यांच्याकरीता प्रार्थना केली).*

## पौलाच्या प्रशिक्षण पद्धतीची सहा तत्वे

- प्रशिक्षण देणारा आणि नवशिके पुढारी यांच्यामध्ये वडील-मुगा अशा प्रकास्वे नाते असावे. आशा प्रकारच्या नातेसंबंधाला तुमच्या संस्कृतीमध्ये काय म्हणतात?
- अधिक अनुभवी अशा पुढाऱ्यांनी त्यांचा मंडळयांमधील व नवनी मंडळयांतील नवशिक्या पुढाऱ्यांना प्रशिक्षण दयावे.
- प्रशिक्षण मिळालेल्या पुढाऱ्यांनी तत्काळ-लागलीच इतर नवशिक्या पुढाऱ्यांना शिकवले पाहिजे.
- प्रशिक्षणार्थी विश्‍वासू असणे ही त्यांची मुख्य पात्रता म्हणजे शिकलेल्या गोष्टी त्यांनी ताबडतोब अमंलात आणल्या पाहिजेत.
- प्रशिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मंडळी विषयी जालून होऊन त्यांच्याकरीता प्रार्थना करतात.
- मंडळया आणि त्यांच्या पुढाऱ्यांच्या गरजा पर्ण करण्यासाठी प्रशिक्षण प्रशिक्षणाचे साहित्य तयार करतात.

**2. येणाऱ्या आठवडयातील कार्यक्रमांविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करा.**

तुमच्या प्रशिक्षाणार्थी साठी नव्या पुढाऱ्यांना प्रशिक्षण देव्याची व्यवस्था करा आणि त्यांना ह्या अभ्यासाच्य प्रती उपलब्ध करुन दया.

कुटुंबप्रभुखांच्या भेटी घेऊन त्यांनी प्रार्थना व उपासने द्वारे आपआपल्या कुटुंबांची काळजी घेता यावी याकरीता प्रशिक्षण देव्यास सुरुवात करा.

सुवार्ता प्रसार कोठे कोठे होत आहे यावर चर्चा करुन गृह गटांचे नेतृत्व कोण करु शकेल याचा शोध घ्या.

तुमच्या पप्रशिक्षाणार्थी गटांच्या गरजा काय आहेत ते विचारुन त्यांना मदत होईल असे छोटे अभ्यासक्रम शोधा किंवा तयार करा.

सहज सापडतील अशा ठिकाणी अभ्यासक्रम जमा करुन ठेवा आणि इतर सेवकांनाही त्यांचा लाभ होऊ दया.

**3. पुढील उपासना सभेसाठी सहकाऱ्यांशी चर्चा करुन योजना आखा.**

येशूने नवीन पुढाऱ्यांना कसे प्रशिक्षण दिले याचे स्पष्टीकरण करुन सांगा (वर दिलेली पवित्र शास्त्रातील वचने व प्रश्नांचा उपयोग करा)

पौला व तीमथ्य ह्यांनी नवीन पुढाऱ्यांना कशा प्रकारे शिकवले याचे स्पष्टीकरण करा, आपल्याला काय करता येईल यावर चर्चा करा.

मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्याची संधी दया.

नवीन पुढाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या सेवकांनी **प्रगतीचा अहवाल** आणि गरजा सादर करणे अगत्याचे आहे.

**प्रभुभोजनाची** ओळख करुन देव्यासाठी गणना 8:1-2 वाचा आणि स्पष्टीकरण करा:

- देवाने आपल्या लोकांची गुलामगिरीतून सुटका केल्यानंतर नवीन मेंढपाळांनी (पाळकांनी) वल्हांडणाचा सण साजरा करण्यासाठी लोकांचे नेतृव केले. कोकऱ्याच्या रक्तामुळे त्यांच्या प्रथम पुत्राचे कसे रक्षण झाले याची त्यांनी आठवण केली.
- या मेजबानीला येशूने नवा अर्थ दिला. तो आमचा वल्हांडणाचा कोकरा आहे.

दोन, तीन वा चार जणांचे गट करा. पाळकांसाठी प्रशिक्षणाची आणि इतर गावांमध्ये सुवार्ता प्रसार करण्यासाठी योजना तयार करा व प्रार्थना करा.

शिक्षकांचा नियम **पाठ करा :** ''जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे, तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा'' (1 करिंथ 11:1)

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net